# प्रेसनोट

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 461/2022 दिनांक : 02.12.2022**

## 1)खुनाचा प्रयत्न :–

**नांदेड ग्रामीण :–**दिनांक 01.12.2022 रोजी रात्री 02.15 वा. चे सुमारास, **टायरबोर्ड जवळ देगलुर नाका नांदेड येथे,** यातील फिर्यादी व साक्षीदार हे तांडा बार येथुन दारू पिऊन त्यांचे मो सा ने देगलुर नाका मार्गे धनेगाव येथे जात असतांना देगलुर नाका येथील इदगाह कमान टायरबोर्ड येथील बंद फुलाचे दुकानातुन हार घेत असतांना मो सा वरील तिघांचा तोल जावुन खाली पडले असता तेथे ॲटो मध्ये बसलेल्या नमुद आरोपीतांनी गाडी अछी चला बे असे म्हणुन शिवीगाळ करून फुलांचे हार का काढले असे म्हणुन यातील आरोपीतांनी संगणमत करून आरोपी क्रं 1 याने खंजर काढुन साक्षीदार अमोल भैया याचे पाठीवर, कमरेजवळ, छातीवर व बरगडीत मारून खुन करण्याचा प्रयत्न केला. त्यास फिर्यादी व साक्षीदार विरोध करत असतांना सदर आरोपीने फिर्यादीचे काखेत खंजर मारून गंभीर दुखापत केली व आरोपी क्रं 3 यांने आरोपी क्रं 2 च्या मदतीने खंजरने साक्षीदार हर्षवर्धन यास उजवे पायाचे ढोपरावर व डावे पायाचे समोरून जांघेत भोसकुन गंभीर दुखापत केली. तसेच फिर्यादी व साक्षीदार पळुन जात असतांना त्यांचा पाठलाग करून आरोपी क्रं 3 याने साक्षीदार अमोल भैया याचे पोटावर वार करून खुन करण्याचा प्रयत्न केला. वगैरे **फिर्यादी अक्षय साहेबराव जमदाडे, वय 20 वर्षे, व्यवसाय मिस्त्रीकाम रा. बौध्दविहार जवळ धनेगाव ता. जि. नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरन 706/2022 कलम 307, 326, 504, 34 भादवि सह कलम 4/25, 4/27 भाहका कायदा सह कलम 135 मपोका प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास **सपोनि/श्री थोरात, मो. नं. 9823298315** हे करीत आहेत.

## 2)मो. सा. चोरी :–

**1)वजिराबाद :–** दिनांक 23.11.2022 रोजी 14.30 ते 16.00 वा. चे दरम्यान, **मनपा कार्यालय नांदेड येथे,** यातील फिर्यादीची हिरो होंडा स्पलेंडर प्लस कंपनीची मो. सा. क्रं एमएच–26/पी–9192 किंमती 15,000/–रुपयाची मनपा कार्यालयाचे पार्कींग मध्ये लावली असता कोणीतरी अज्ञात चोरटयांने चोरून नेली. वगैरे **फिर्यादी भीवाजी मुजाजी वडजे, वय 62 वर्षे, व्यवसाय सेवानिवृत्त रा. वसरणी नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे वजिराबाद** गुरन 419/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/11 सोनटक्के, मो. क्रं. 8805007511** हे करीत आहेत.

**2)रामतिर्थ :–** दिनांक 28.11.2022 रोजी 16.00 वा. चे सुमारास, **फिर्यादीचे शिवशंकर हॉटेल समोरून रोडवर नरसी ता. नायगाव जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीची हिरो कंपनीची मो. सा. क्रं एमएच–26/बीजे–9537 किंमती 35,000/–रुपयाची शिवशंकर भोजनालया समोरून कोणीतरी अज्ञात चोरटयांने चोरून नेली आहे. वगैरे **फिर्यादी मारोती माधवराव नारे, वय 55 वर्षे, व्यवसाय शेती रा. नरसी ता. नायगाव जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे रामतिर्थ** गुरन 188/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2441 आडे, मो. क्रं. 9923592421** हे करीत आहेत.

## 3)हायवा टिपर चोरी :–

**रामतिर्थ :–** दिनांक 28.11.2022 रोजी 01.00 ते 05.00 वा. चे दरम्यान, **मौ लोहगाव शिवारात बिलोली जाणाऱ्या रोडवर बाजुला फिर्यादीचे इमारीतचे बांधकाम चालु असणाऱ्या ठिकाणावरून मौ. लोहगांव ता. बिलोली जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीची अशोक लिलॅन्ड कपंणीची हायवा टिपर क्रं. एमएच–26/बीइ–3933 किंमती 20,00,000/–रूपयाची ही नमुद ठिकाणावरुन कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरुन नेली. वगैरे **फिर्यादी आनंदकुमार हनुमंतराव वानोळे, वय 32 वर्षे, व्यवसाय शेती रा. लोहगाव ता. बिलोली जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे रामतिर्थ** गुरन 189/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री दिघे, मो.क्रं. 9834255985** हे करीत आहेत.

## 4)चोरी :–

**अर्धापुर :–** दिनांक 28.11.2022 रोजी रात्री 08.00 ते दिनांक 29.11.2022 रोजी 06.00 वा. चे दरम्यान, **मौ. लोणी बु. ता. अर्धापुर जि. नांदेड येथे,** यातील अज्ञात आरोपीने फिर्यादीचे सौर कृषी योजना अंतर्गत सौर ऊर्जा पंप यावर चालणारी ओसावेल कंपणीची पाण्यातील मोटर 3 एचपी किंमती अंदाजे 35,000/–रूपयाचे चोरून नेले आहे. वगैरे **फिर्यादी गजानन शिवदास लोसनवार, वय 26 वर्षे, व्यवसाय शेती रा. लोणी बु. ता. अर्धापुर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे अर्धापुर** गुरन 325/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/2544 आनेबोईनवाड, मो.क्रं. 9529971005** हे करीत आहेत.

## 4)विवाहीतेचा छळ :–

**1)नांदेड ग्रामीण** :– दिनांक 10 ऑगष्ट 2015 ते दिनांक 30.11.2022 चे दरम्यान, **मधुबन शाळेजवळ धनेगाव ता. जि. नांदेड येथे**, यातील नमुद पाच आरोपीतांनी संगणमत करुन फिर्यादी बाईस मो सा घेण्यासाठी तुझे माहेरहुन एक लाख रूपये घेवुन ये म्हणुन शिवीगाळ व मारहाण करून उपाशी पोटी ठेवुन तीचा शारिरीक व माणसीक छळ केला व जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी 25 वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 707/2022 कलम 498(अ),323,504,506,34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/श्री भालेराव, मो.क्रं. 9823298315** हे करीत आहेत.

## 4)आत्महत्येस प्रवृत केले :–

**वजिराबाद** :–दिनांक 30.11.2022 रोजी चे 16.00 ते 16.15 वा. चे दरम्यान, **फिर्यादीचे राहाते घरी नांदेड येथे**, यातील **मयत नामे अश्विनी अरविंद जोंधळे, वय 18 वर्षे, व्यवसाय शिक्षण रा. शांतीधाम गोवर्धनघाट नांदेड**, ही व आरोपी हे गेल्या तीन वर्षा पाासुन मोबाईल द्वारे एकमेकांच्या संपर्कात होते. यातील नमुद आरोपी हा पिडीतेस मागील कांही दिवसा पासुन लग्न करण्यासाठी मानसीक त्रास देत होता आरोपीच्या सततच्या त्रासाला कंटाळुन गळफास घेवुन आत्महत्या केली. व तीचे आत्महत्येस यातील नमुद आरोपी हा कारणीभुत आहे. वगैर **फिर्यादी रेखा भ्र. अरविंद जोंधळे, वय 39 वर्षे, व्ययवसाय मजुरी रा. शांतीधाम गोवर्धन घाट नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे वजिराबाद** गुरन 420/2022 कलम 306, भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री आगलावे मो.नं. 9890630130** हे करीत आहेत.

## 5)अपघात :–

**1)हदगांव** :– दिनांक 11.11.2022 रोजी 16.00 ते 16.15 वा. चे वा. चे दरम्यान, **इरिगेशन कॉलनी जवळ हदगाव ता. हदगाव जि. नांदेड येथे**, यातील फिर्यादीचा **भाऊ मयत नामे श्यामसुंदर रावसाहेब कापरे, वय 68 वर्षे, रा. तामसा रोड हदगाव ता. हदगाव जि. नांदेड** हा सायकल वरून जात असतांना अज्ञात पांढऱ्या रंगाचे बोलेरो पिकअप नंबर नसलेल्या चालकाने त्याचे ताब्यातील वाहन हयगय व निष्काजीपणे, भरधाव वेगात चालवुन मयत यास पाठीमागुन जोराची धडक मारून त्याचे मरणास कारणीभुत झाला. वगैरे **फिर्यादी श्रीनिवास श्यामसुदंर कापरे, वय 38 वर्षे, रा. तामसा रोड हदगाव ता. हदगांव जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे हदगांव** गुरनं. 336/2022 कलम 279, 304(अ) भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/श्री भोसले, मो.क्र. 9552591244** हे करीत आहेत.

## 6)ई. सी. ॲक्ट :–

**इस्लापुर** :– दिनांक 25.11.2022 रोजी चे 16.00 वा. चे सुमारास, **आरोपीचे घरा समोर मौ. कोसमेट ता. किनवट जि. नांदेड येथे**, यातील नमुद आरोपी हा कोसमेट स्वस्त दुकान क्रमांक 60 दुकानदार आहे. प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजना वितरण करण्यासाठी दिलेले धान्य पैकी दिनांक 25.11.2022 रोजी 58 गोणी गहु शासनाचा लोगो असलेला किंमती 64,000/–रूपयाचा व एक वाहन क्रं एपी–01/एक्स–3944 किंमती 2,00,000/–रूपयाचा असा एकुण 2,64,000/–रूपयाचे मालासह बिना परवाना बेकायदेशिररित्या चोरटी विक्री करण्याच्या उदेशाने वाहतुक करताना मिळुन आला. वगैरे **फिर्यादी सतिश बाळासाहेब सरनायक, वय 50 वर्षे, व्यवसाय पुरवठा निरीक्षक तहसील कार्यालय किनवट ता. किनवट जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे इस्लापुर** गुरन 116/2022 कलम 3/7 ई. सी. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री शेवाळे, मो.नं. 9405524001** हे करीत आहेत.

## 7)जुगार :–

**1)हिमायतनगर** :– दिनांक 01.12.2022 रोजी 14.40 वा. चे सुमारास, **पोस्ट ऑफिसचे जागेत टिनपत्राचे शेडमध्ये ता. हिमायतनगर जि. नांदेड येथे**, यातील नमुद सात आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशिररित्या तिर्रट नावाचा जुगार खेळत व खेळवीत असतांना नगदी व साहित्य असा एकुण 7460/–रूपये व जुगाराचे साहित्यासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोना/656, अविनाश श्यामसुंदर कुलकर्णी, ने. पोस्टे हिमायतनगर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे हिमायतनगर** गुरनं 271/2022 कलम 12(अ), 4, 5 म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2303 शिंगणवाड, मो.क्र. 9049075521** हे करीत आहेत.

**2)भाग्यनगर :—** दिनांक 01.12.2022 रोजी 17.30 वा. चे सुमारास, **छत्रपती चौक स्वागत बार समोर रोडवर नांदेड येथे,** यातील नमुद दोन आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशिररित्या मिलन डे नावाचा मटका जुगार खेळत व खेळवीत असतांना नगदी व साहित्य असा एकुण 1520/—रूपये व जुगाराचे साहित्यासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/2300, रावसाहेब पुरबाजी जाधव, ने. पोस्टे भाग्यनगर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भाग्यनगर** गुरनं 436/2022 कलम 12(अ), म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2309 जाधव, मो.क्र. 9049343095** हे करीत आहेत.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड

# <u>प्रेसनोट</u>

<u>पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 462/2022 दिनांक : 02.12.2022</u>

दिनांक 05.12.2022 ते दिनांक 08.12.2022 या कालावधीममध्ये नांदेड जिल्हयातील पोस्टे माहुर हद्यीत **माहुरगड येथे श्री दत्तजयंती उत्सव** साजरा होणार असुन सदर यात्रेत महाराष्ट्र, तेलंगणा, आंधप्रदेश, कर्नाटक या व इतर राज्यातुन भाविकांची दर्शनासाठी मोठया प्रमाणावर गर्दी होते. त्या अनुषंगाने निघणाऱ्या मिरवणुका व इतर कार्यक्रम शांततेत पार पाडावे, त्यामध्ये कोणतीही बाधा येऊ नये व शांतता राहावी म्हणुन **मी श्रीकृष्ण कोकाटे**, पोलीस अधीक्षक, नांदेड मला महाराष्ट्र पोलीस अधिनियम 1951 कलम 36 प्रमाणे प्रदान झालेल्या अधिकारान्वये खालील प्रमाणे आदेश देत आहे.

दिनांक 05.12.2022 चे 00.00 वा. पासुन ते दिनांक 08.12.2022 चे 24.00 वा. पर्यंत नांदेड जिहयातील **श्री विजय डोंगरे**, उपविभागीय पोलीस अधिकारी, किनवट चार्ज उपविभाग माहुर व पोस्टे माहुरचे प्रभारी अधिकारी **श्री नामदेव रिठ्ठे**, पोलीस निरीक्षक यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम 1951 कलम 36 मधील पोट कलमे "अ" ते "फ" प्रमाणे खालील अधिकार प्रदान करण्यात आले आहेत.

अ)रस्त्यावरील व रस्त्याने जाणाऱ्या मिरवणुकीतील किंवा जमावातील लोकांनी कशा रितीने चालावे व कोणत्या रितीने वागावे ते फर्माविण्यासाठी

ब)अशा कोणत्याही मिरवणुका कोणत्या मार्गांनी आणि कोणत्या वेळात काढाव्यात किंवा काढु नयेत असे मार्ग व अशा वेळा विहित करण्याबदल

क)सर्व मिरवणुकीच्या व जमावाच्या प्रसंगी व पुजा–अर्चेच्या प्रार्थना स्थळाच्या सर्व जागेच्या आसपास पुजा अर्चेच्या वेळी कोणताही रस्ता किंवा सार्वजनिक जागा येथे गर्दी होणार असेल किंवा अडथळे होण्याचा संभव असेल अशा सर्व बाबतीत अडथळा होऊ न देण्याबदल,

ड)सर्व रस्त्यांवर किंवा रस्त्यांमध्ये, घाटांत किंवा घाटांवर, सर्व धक्कयांवर किंवा धक्कयांमध्ये आणि सार्वजनिक स्थळी किंवा लोकांच्या जाण्या येण्याच्या जागेमध्ये सुव्यवस्था राखण्याबदल,

ई)तसेच सार्वजनिक ठिकाणी अथवा सार्वजनिक करमणूकीच्या ठिकाणी ध्वनिक्षेपकांच्या आवाजावर नियंत्रण ठेवण्यासाठी व सुचना देण्यासंबधी,

फ)महाराष्ट्र पोलीस अधिनियम 1951 चे कलम 33, 35, ते 40, 42, 43, 45 या अन्वये दिलेल्या कोणत्याही आदेशास अधिन असलेले व त्यास पुष्टी देणारे सुव्यवस्था राखणेकामी योग्य आदेश देणेबबात.

मी यापुढे असाही आदेश देतो की, कोणत्याही इसमांनी सदरचा आदेश लागु असे पर्यंत नांदेड जिल्हयातील तालुका माहुर येथील श्री विजय डोंगरे, उपविभागीय पोलीस अधिकारी, किनवट चार्ज विभाग माहुर व पोस्टे माहुरचे प्रभारी अधिकारी श्री नपामदेव रिठ्ठे, पोलीस निरीक्षक यांचेकडुन रहदारीचे नियम व मार्गाबाबत सुचना कार्यक्रमाची तारीख/वेळ/जाहिरसभा/मोर्चे/मिरवणुक /निदर्शने/पदयात्रा/इत्यादी कार्यक्रम संबंधीतांनी दिलेल्या आदेशाचे पालन करावे. परवाणगी दिलेल्या जाहीर <u>सभा/मिरवणुका/पदयात्रा</u> यात समयोजित घोषणा सोडुन किंवा ज्या घोषणामुळे शांतता व सुव्यवस्थेला बाधा होऊ शकते अशा घाषणा देऊ नये.

सदरचा आदेश लग्नाच्या ठिकाणी, प्रेत यात्रेस लागु नाही.

सदरचा आदेश नांदेड जिल्हयातील पोस्टे माहुर ह्द्यीत दिनांक 05.12.2022 चे 00.00 पासुन ते दिनांक 08.12. 2022 चे 24.00 वा. पर्यंत लागु राहील. असा आदेश माझे सही व शिक्क्यानिशी दिनांक 25.11.2022 रोजी दिला आहे.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड